www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ
■ वर्ष - ०२ ■ अंक १९६ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, गुरुवार, १९ डिसेंबर २०२४ ■ रु. २/-
■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

■ 'आपले सरकार पोर्टल'वरील २ हजार ३०१...
पान ३ वर....




■ बाळासाहेब ठाकरे स्मारकाचे ९९ टक्के काम पूर्ण
पान ६ वर....

# एलिफंटाकडे जाताना नीलकमल बोट उलटली

■ १३ जणांचा मृत्यू ■ ७७ प्रवाशांची सुटका ■ इंडियन नेव्हीच्या स्पीड बोटची धडक

● मुंबई, विशाल कारंडे :

एलिफंटाकडे जाणाऱ्या बोटीच्या दुर्घटनेसंबंधी एक मोठी माहिती समोर आली आहे. या अपघातात तीन नव्हे तर १३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती नौदलाने दिल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. मृतांमध्ये १० जण प्रवाशी आणि तीन नेव्हीचे कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या अपघातात दोन गंभीर जखमींवर नौदलाच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



ही आकडेवारी अंतिम नसून, यामध्ये अद्याप कुणी बेपत्ता असेल किंवा मृत असेल त्याची माहिती गुरुवारी सकाळपर्यंत मिळेल अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या प्रकरणाची चौकशी आता मुंबई पोलिस आणि नौदलाकडून करण्यात येणार आहे. ज्या 13 जणांचा मृत्यू झाला आहे त्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 5 लाखांची मदत ही मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सांगितलं. नेव्हीच्या ज्या बोटीने नीलकमल या बोटीला धडक दिली तिच्या संबंधी मोठी माहिती समोर आली आहे. या बोटीच्या नवीन इंजिनचे टेस्टिंग सुरू होते.

### प्रत्यक्षदर्शी काय म्हणाला?

■ आमची बोट समुद्रात पाच ते आठ किलोमीटर आतमध्ये गेली. त्यावेळी मी बोटीच्या वरच्या डेकवर उभा होतो. त्यावेळी एक स्पीडबोट आमच्या बोटीच्या आजुबाजूला फिरत होती. ही स्पीडबोट कधीही आमच्या बोटीला धडकेल, असे मला वाटत होते आणि तसेच घडले. ही स्पीडबोट जोरात येऊन आमच्या बोटीला धडकली. त्यावेळी स्पीडबोटमधील एकाचा जागीच मृत्यू झाला. तर दुसऱ्या प्रवाशाचा पाय कापला केला. रक्तबंबाळ अवस्थेतील त्या प्रवाशाला आमच्या बोटीत घेण्यात आले. स्पीडबोटची धडक बसल्यानंतर आमच्या बोटीत पाणी शिरायला झाले आणि बोट समुद्रात बुडायला लागली, अशी माहिती प्रत्यदर्शीने दिली.

### दुर्घटनाग्रस्तांना योग्य मदत करण्यात येईल -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



"मुंबई येथील गेट वे हून एलिफंटाकडे जाताना बोट उलटली. ही घटना अतिशय दुर्दैवी व दु:खद आहे. अंदाजे सात ते आठ जण बेपत्ता आहेत. त्यांचा शोध सुरु आहे. दुर्घटनाग्रस्तांना योग्य मदत करण्यात येईल असे, निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, बोटीतील लोकांना मदत वेळेवर पोहोचल्यामुळे त्यांना वाचवता आले. या घटनेची अधिकची सविस्तर माहिती घेतली जाईल. दुर्घटना ग्रस्तांना योग्य ती मदत दिली जाईल.


## गृहमंत्री अमित शाहांच्या विधानातून संविधान निर्मात्याबद्दल असलेला भाजपाचा राग बाहेर आला: नाना पटोले

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान केल्याबद्दल अमित शाहांनी देशाची माफी मागावी

● नागपूर, नितीन देवळेकर :

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा ज्या पद्धतीने उल्लेख केला तो अत्यंत आक्षेपार्ह आहे. आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर नाव घेण्याची फॅशनच आली आहे. एवढ्यावेळा देवाचे नाव घेतले तर देव पावला असता असे वक्तव्य केले. अमित शाह यांच्या या विधानातून भाजपाला देशाच्या संविधान निमार्त्याबद्दल किती राग आहे तेच बाहेर आले असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दलचा भाजपाचा खरा चेहरा जनतेच्या समोर आला आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.

पान २ वर




■ विधिमंडळ परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलेल्या विधानाचा काँग्रेस पक्ष जाहीर निषेध करत आहे.

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुधीर रसाळ यांना साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर

● मुंबई, यश सावंत :

यंदाच्या साहित्य अकादमी पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. ज्येष्ठ साहित्यिक आणि समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना यंदाचा हा साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांचे समीक्षात्मक पुस्तक 'विंदांचे गद्यरुप' या पुस्तकासाठी हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

सुप्रसिध्द मराठी समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार देण्यात आल्याची घोषणा साहित्य अकादमीने केली आहे. रसाळ हे मराठी साहित्यसृष्टीत प्रामुख्याने समीक्षक म्हणूनच ओळखले जातात.



यानिमित्तानं रसाळ सरांचं ईटीव्ही भारतनं दूरध्वनीवरुन अभिनंदन केलं. त्यावेळी त्यांनी पुरस्कार मिळाल्यानंतरची पहिली एक्सक्लुझिव्ह प्रतिक्रिया ईटीव्ही भारतला दिली.


पान २ वर

### थोडक्यात

#### विधानसभा तालिका अध्यक्ष म्हणून सदस्य चैनसुख संचेती यांची नियुक्ती जाहीर

नागपूर : विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी विधानसभा कामकाजासाठी सदस्य चैनसुख संचेती यांची तालिका अध्यक्ष म्हणून नियुक्ती जाहीर केली.

#### विमानतळावरून साडेपाच कोटींचा गांजा जप्त



मुंबई : सीमाशुल्क विभागाने छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावर सोमवारी केलेल्या कारवाईत साडेपाच किलो गांजा जप्त केला. याप्रकरणी बँकॉकहून आलेल्या एका प्रवाशाला अटक करण्यात आल्याची माहिती सीमाशुल्क विभागाकडून देण्यात आली. आरोपीविरोधात अमली पदार्थ विरोधी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सीमाशुल्क विभागाने सोमवारी मध्यरात्री ही कारवाई केली. एक संशयीत प्रवासी बँकॉकहून अमली पदार्थ घेऊन येणार असल्याची माहिती सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे एका प्रवशाला ताब्यात घेऊन तपासणी करण्यात आली.

#### भिवंडीत बांगलादेशींना अटक

ठाणे : बेकायदेशरित्या भारतात प्रवेश केलेल्या दोन बांगलादेशींना भिवंडी पोलिसांनी अटक केली आहे. रमजान शेख (३२) आणि कबीर शेख (४०) अशी अटकेत असलेल्या बांगलादेशींची नावे आहेत. दोघेही भिवंडी शहरात नळ जोडणीचा व्यवसाय करत होते. त्यांनी भारतात प्रवेश कसा मिळविला याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.


भिवंडी येथील खोका कंपाऊंड परिसरातील झोपडपट्टीमध्ये बांगलादेशी वास्तव्य करत असल्याची माहिती भिवंडी शहर पोलिसांना मिळाली होती. याबाबत पोलिसांनी तपास केला असता, रमजान आणि कबीर हे दोघेही भाड्याच्या घरामध्ये राहत असल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी ते बांगलादेशी असल्याचे कबूल केले.

### गणेश नाईकांना मंत्रिपद मिळाल्यामुळे वाढीव पाण्याची आस

## बारवी धरणाचे पाणी शहराला मिळण्याची आशा बळावली

● नवी मुंबई, भावना जैन :

ठाणे जिल्ह्यातील प्रमुख शहरांचा पाण्याचा महत्वाचा स्रोत असलेल्या बारवी धरणातून नवी मुंबई शहराला मंजूर असलेला पाण्याचा कोटा गणेश नाईक यांच्याकडे मंत्रिपद आल्याने यापुढील काळा पूर्ण क्षमतेने शहराला मिळेल अशी आशा नव्याने निर्माण झाली आहे. ८० दशलक्ष लीटर पाण्यापैकी सद्यस्थितीत नवी मुंबईकरांच्या वाट्याला जेमतेम ५५ ते ६० दशलक्ष लिटर इतकेच पाणी येते. यामुळे दिघा, ऐरोली, घणसोली यासारख्या उपनगरात अनेकदा पाणी टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण होते अशा तक्रारी आहेत. आमदार असताना नाईक यांनी या मुद्द्यावरून आक्रमक भूमिका घेतल्याचे



चित्र होते. त्यांच्याकडे मंत्रिपद आल्याने बारवीचे पाणी पूर्ण क्षमतेने शहराला मिळवून देण्याचे मोठे आव्हान नाईकांना आगामी काळात पेलावे लागणार आहे. बारवी धरणात पाण्याचा जलसाठा वाढावा यासाठी या धरणाची उंची वाढवण्यात आली आहे. त्यामुळे धरणात पहिल्यापेक्षा अधिक पाणीसाठा होत असतो. धरणाच्या वाढलेल्या उंचीमुळे बारवी धरणात ४८८ दक्षलक्ष लीटर अधिक पाणीसाठा होत असून या पाण्याचा वापर करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अतिरिक्त पाणी वापराचे समन्यायी धोरण मध्यंतरी ठरविण्यात आले होते.

पान २ वर

## 'माझी वसुंधरा ४.०' अभियानात ठाणे महापालिकेने तिस-या क्रमांकासह पटकाविले ६ कोटी रुपयांचे बक्षीस

● ठाणे, रोहित जैसवाल :

राज्यशासनाच्या पर्यावरण व वातावरण बदल विभागाच्या माध्यमातून दरवर्षी माझी वसुंधरा ४.०अभियान राबविण्यात येते. शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार ठाणे महानगरपालिकेने १ एप्रिल २०२३ ते ३१ मे २०२४ या कालावधीत पर्यावरण संवर्धनासाठी विविध कार्यक्रम राबविले. या मोहिमेतंर्गत् अमृत गटातून १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गटामध्ये ठाणे महानगरपालिकेने तिसऱ्या क्रमांकासह ६ कोटींचे बक्षीस प्राप्त केले असल्याचे शासनाच्या पर्यावरण व वातावरण विभागाने नुकतेच जाहिर केले. हा पुरस्कार ठाणे महापालिकेने प्राप्त केल्याबद्दल शासनाने महापालिका प्रशासनाचे कौतुक केले असल्याची माहिती आयुक्त सौरभ राव यांनी दिली.



राज्यशासनाच्या माध्यमातून दरवर्षी माझी वसुंधरा ४.० हे अभियान राबविण्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार ठाणे महापालिकेने विभागातंर्गत वर्षभर विविध उपक्रम राबवून पर्यावरणाचे जतन व संवर्धन चांगल्या प्रकारे केले आहे. यामध्ये महापालिका क्षेत्रामध्ये १ लाख २८ हजार १५६ भारतीय प्रजातींच्या वृक्षांची लागवड एकूण ६२ हेक्टर जागेत व ८८३ मीटर लांब रस्त्यांच्या कडेला केली आहे. तर ८३ नवीन हरित क्षेत्रांची निर्मिती केली असून निगा व देखभाल पी.पी तत्वावर विविध संस्थांच्या माध्यमातून करीत आहे. तसेच दैनंदिन जमा होणाऱ्या ओला व सुका कचरा प्रकल्प कार्यान्वित केले असून १० सुका कचरा व्यवस्थापन प्रकल्प तर ८ खतनिर्मिती प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे बायो मेडिकल वेस्ट आणि C & D वेस्ट यावर मोठ्या प्रमाणात संकलन व पुनर्चक्रीकरणाची प्रक्रिया सुरू केली आहे. तसेच प्लॅस्टिक बंदी मोहिम प्रभावीपणे सातत्याने सुरू आहे. परिवहन उपक्रमातंर्गत १२३ ई-बसेस खरेदी करुन विद्युत वाहनांना चार्जिंग सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

पान २ वर

## अधिक सक्षम होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक - प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

■ नागपूर प्रेस क्लब येथे पत्रकारांसाठी विशेष व्याख्यान
■ आपली पत्रकारिता 'रिअलटाईम' करण्यासाठी 'एआय' उपयुक्त

● नागपूर, नितीन देवळेकर :

माध्यमात कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तिला अधिक माहिती सक्षम होण्याचा मार्ग कृत्रिम बुद्धिमत्तेने म्हणजेच 'एआय' ने उपलब्ध करून दिला आहे. आपल्या मातृभाषेतून मिळणा-या ज्ञानाला ज्या मर्यादा होत्या, त्या मर्यादा आता 'एआय' च्या माध्यमातून कमी झाल्या आहेत. ज्या भाषेत आपल्याला माहिती हवी आहे, त्या भाषेत ती सहजरित्या उपलब्ध होते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेपासून दूर राहण्याऐवजी तंत्रज्ञान समजून घेणे आणि आपल्या वापरातून ते अधिक परिपूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे प्रतिपादन माहिती व




जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले. नागपूर प्रेस क्लब आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक नागपूर कार्यालयाच्या वतीने 'आर्टिफिशल इंटेलिजन्स इन जर्नालिझम' (कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता) या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

ज्येष्ठ पत्रकार तथा माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमास नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नागपूर - अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे, माहिती संचालक किशोर गांगुर्डे, दयानंद कांबळे उपस्थित होते.

श्री. ब्रिजेश सिंह म्हणाले, कोणतेही नवीन तंत्रज्ञान आले की नोक-या कमी होतील, अशी एक भीती व्यक्त होत असते. मात्र तंत्रज्ञानातून नवनवीन संधी निर्माण झाल्याची प्रचिती आपण आजवर घेत आलो आहोत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीतही अशीच भीती व्यक्त केली जात आहे.

पान २ वर

## "मी काँग्रेसला दोष द्यायला तयार नाही" - प्रकाश आंबेडकर

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी राज्यसभेत बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबत केलेल्या विधानाचे सर्वत्र पडसाद उमटताना दिसत आहेत. या विधानावरून राजकीय वातावरण देखील चांगलेच तापल्याचे पाहायला मिळत आहे. विरोधकांकडून अमित शाह आणि केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली जात आहे. यादरम्यान विरोधकांच्या टीकेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर केलेल्या पोस्ट्समध्ये काँग्रेसने कशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान केला याबद्दल माहिती दिली आहे. त्यांना एक यादी देत वेगवेगळे दावे केले आहेत. ज्यामध्ये काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा निवडणूकीत दोन वेळा पराभव केल्याच्या पुनरुच्चार करण्यात आला आहे. दरम्यान यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आणि वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

पान २ वर

## संपादकीय

# दिशादर्शक कौशल्य जनगणना

कौशल्य जनगणनेचे मुख्य उद्दिष्ट तरुणांमधील कौशल्ये ओळखणे आणि त्यांना नोकरीच्या चांगल्या संधी सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण प्रदान करणे हे आहे. विकसित भारतासाठी कौशल्य जनगणना दिशादर्शक ठरेल असे अर्थतज्ज्ञांचे मत असून यामुळे भारताच्या विकासाला एक नवीन चालना मिळेल. जगात सिंगापूर, कॅनडा, युनायटेड किंगडम, ऑस्ट्रेलिया आणि जर्मनी यांसारख्या अनेक देशांमध्ये कौशल्य मूल्यांकन यशस्वी ठरले आहे. यावर्षी, आंध्र प्रदेश सरकार 'कौशल्य जनगणना करत आहे, जी देशातील पहिली कौशल्य जनगणना आहे.

कौशल्य जनगणना म्हणजे विविध क्षेत्रांत स्वारस्य असलेल्या तरुणांची ओळख करून त्यांना विशेष प्रशिक्षण देण्याचा प्रकल्प तसेच एका विशिष्ट प्रदेशाची किंवा देशातील लोकसंख्येची कौशल्य पातळी आणि क्षमतांची मोजणी करणे. कौशल्य जनगणनेत प्रदेशातील किंवा देशातील व्यक्तीकडे असलेल्या कौशल्यांची माहिती सर्वेक्षणाद्वारे गोळा केली जाते. युवकांमध्ये कौशल्ये विकसित करून त्यांना चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. तसेच लोकसंख्येतील सध्याच्या कौशल्य पातळीचे मूल्यांकन करणे, कौशल्याची कमतरता किंवा उद्योगाच्या गरजांशी जुळणारे क्षेत्र ओळखणे, कौशल्य विकास आणि व्यावसायिक प्रशिक्षणासाठी लक्ष्क्ष्यत धोरणे विकसित करणे, रोजगारक्षमता आणि कामगार उत्पादकता वाढवणे हे होय.

कौशल्य जनगणनेद्वारे पुढील गोष्टी साध्य करता येऊ शकतात. विविध क्षेत्रात आवड असलेल्या तरुणांची ओळख करून त्यांना विशेष प्रशिक्षण देणे, त्यांना रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देणे, कोणत्या क्षेत्रात कौशल्य प्रशिक्षण आवश्यक आहे हे ओळखणे, नवीन महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये कौशल्य महाविद्यालये, हब, केंद्रे उभारणे, प्रशिक्षणानंतर उमेदवारांना प्रमाणपत्र प्रदान करणे, कंपन्यांकडून कोणत्या प्रकारची कौशल्ये आवश्यक आहेत याचा तपशील घेणे, त्यानुसार प्रशिक्षित करून संबंधित कंपन्यांशी संपर्क साधून युवकांना तेथे पाठविणे.

भारतात आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू किनारपट्टीच्या राज्यात कौशल्य जनगणना सुरू करत आहेत. देशातील पहिल्या कौशल्य जनगणनेचा पायलट प्रोजेक्ट आंध्र प्रदेशातील मंगलगिरी मतदारसंघात सुरू आहे, ज्याचे प्रतिनिधित्व आयटी आणि मनुष्यबळ विकास मंत्री नारा लोकेश करत आहेत. प्रगणकांनी ४२ टक्क्यांपेक्षा जास्त कुटुंबे समाविष्ट केली आहेत आणि डेटाचे संकलन आंध्र प्रदेश राज्य कौशल्य विकास महामंडळ (A एपीएसएसडीसी) येथे सुरू झाले आहे. लोकेश यांनी अधिकायांना नोव्हेंबर अखेर जनगणना पूर्ण करण्यासाठी सांगितले होते तसेच ते राज्यातील इतर भागांमध्ये वाढवण्यासाठी रोडमैप तयार करण्यात येईल. आंध्रच्या कौशल्य जनगणनेने सरकार, नियोक्ते आणि इतर भागधारकांसाठी अचूक डेटा प्रदान करणे अपेक्षित आहे, ज्यामुळे त्यांना कार्यबल विकास आणि संसाधन वाटपाबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेण्यात मदत होईल. हे शैक्षणिक संस्थांना त्यांचे अभ्यासक्रम उद्योगाच्या गरजांनुसार निश्चित करण्यासाठी मार्गदर्शन करेल.

कौशल्य जनगणनेमध्ये, आंध्र प्रदेश सरकार कार्यशील लोकसंख्येमध्ये असलेल्या (१५ ते ५९ वर्षे) कौशल्याची मोजणी करणार आहे. कौशल्य जनगणनेमध्ये लोकांकडे असलेली कौशल्ये नोंदवली जातील, ज्यात त्यांनी त्यांच्या नोकषांद्वारे अनौपचारिकपणे शिकलेल्या कौशल्यांचा पण समावेश असणार आहे. ही जनगणना सर्व प्रमुख उद्योग आणि एमएसएमईना आवश्यक असलेल्या कौशल्यांचे दस्तऐवजीकरण करेल, त्यामुळे उद्योग-व्यापी कौशल्याचा प्रभावीपणे डेटाबेस तयार होईल. कौशल्य जनगणनेद्वारे गोळा केलेल्या डेटाच्या आधारे, सरकार बाजारातील मागणीच्या आधारे लोकांचे कौशल्य

# महाविद्यालयांची संकेतस्थळे जुनाटच!

पारदर्शकता हे मूलभूत उद्दिष्ट ठेवून सुरू झालेल्या 'नवीन शैक्षणिक धोरण २०२०'च्या मार्गात महाविद्यालयांची जुनाट संकेतस्थळे अडसर ठरत आहेत. उच्च शिक्षण संस्था समाजाला उत्तरदायी असल्याने शैक्षणिक संस्थांविषयी महत्त्वाची माहिती संकेतस्थळांवर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. त्यांचे व्यवहार आणि हिशेब सार्वजनिक होणे गरजेचे आहे. हे उत्तरदायित्व अधिक बळकट करण्यासाठी महाविद्यालयांना आपली माहिती सार्वजनिक करावी लागणार आहे. दर्जेदार महाविद्यालयांचा विद्यार्थी शोध घेत असतो तेव्हा माहितीअभावी किंवा चुकीच्या माहितीमुळे त्याचा बराच वेळ वाया जातो. एकत्रित स्वरूपात सर्वंकष माहितीसाठी संकेतस्थळ महत्त्वाचे आहे. परंतु बहुतांश महाविद्यालयांची संकेतस्थळे अद्ययावत नसल्याने माहिती प्राप्त करताना अडचणी निर्माण होतात.

नवीन शैक्षणिक धोरणाने आता वेग घेतला असल्याने विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), दिल्ली कार्यालयाने १० जून २०२४ रोजी उच्च शिक्षण संस्थांसाठी महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या. महाविद्यालयांनी त्यांच्या संकेतस्थळांवर माहितीचे स्व-प्रकटीकरण प्रसिद्ध करावे, असे दिशानिर्देश देण्यात आले. सर्वांसाठी उपलब्ध असलेली माहिती उत्तरदायित्व विकसित करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल, अशी विद्यापीठ अनुदान आयोगाची भूमिका आहे. आयोगाने अशा माहितीचे वर्गीकरण करून एक यादी प्रकाशित केली आहे. यामध्ये संस्थेविषयी, प्रशासन, शैक्षणिक, प्रवेश आणि शुल्क, संशोधन, विद्यार्थी जीवन, माजी विद्यार्थी, माहिती विभाग, प्रतिमा, संपर्क असे घटक समाविष्ट आहेत.

नॅक या मूल्यांकन संस्थेनेदेखील महाविद्यालयांचे संकेतस्थळ केवळ औपचारिकता ठरून चालणार नाही, तर ते कार्यरतदेखील असणे अनिवार्य असल्याचे म्हटले आहे, मात्र विद्यापीठ अनुदान आयोगाने मार्गदर्शक सूचना जारी करून सहा महिने उलटले असले तरी संकेतस्थळांची अवस्था जैसे थे आहे. 'संस्थेविषयी माहिती' या घटकाअंतर्गत ताळेबंद, उत्पन्न आणि खर्च, पावत्या आणि देयके यांसह लेखापरीक्षण अहवाल, इ. माहिती देणे अपेक्षित आहे. परंतु काही महाविद्यालयांना ही डोकेदुखी वाटते. संकेतस्थळांच्या माध्यमातून आर्थिक बाबीसमोर येणार असल्याने आर्थिक बेशिस्त, अनियमितता, भ्रष्टाचार, इ. कुप्रथांना लगाम लगू शकतो. यामुळे माहितीच्या अधिकाराअंतर्गत केल्या जाणाऱ्या अर्जांचे प्रमाणही वाढण्याची शक्यता आहे. म्हणून स्वप्रकटीकरणात टाळाटाळ होताना दिसते. यापूर्वीही नॅकने स्वयंमूल्यांकन अहवालात पाच वर्षांचे अंकेक्षण अहवाल समाविष्ट करणे बंधनकारक केले होते. परंतु अनेक महाविद्यालयांनी मूल्यांकनानंतर काही आठवड्यांत अंकेक्षण अहवाल संकेतस्थळांवरून काढून घेतले.

संकेतस्थळांवरून माहिती मिळवताना सहजता हा घटक परिणामकारक ठरतो. कुठल्याही अडथळ्याशिवाय, खाते न खोलता, नावनोंदणी न करता नागरिकांना माहिती सहजपणे प्राप्त करता यावी, असेही आयोगाने सुचवले आहे. त्यामुळे महाविद्यालयांना संकेतस्थळावर 'शोध' सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. शोध सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध असल्यास आवश्यक त्या माहितीपर्यंत सहजपणे पोचता येते. त्यामुळे ५० टक्के वापरकर्ते संकेतस्थळावर अधिक काळ माहितीचा शोध घेणे पसंत करतात, असा 'शोध अनुभव' या अभ्यासाचा निष्कर्ष आहे. बहुतांश संकेतस्थळांवर 'शोध' सुविधा उपलब्ध नसल्याने माहिती सहजपणे उपलब्ध होत नाही.

'प्रशासन' घटकाअंतर्गत मुख्य सतर्कता अधिकारी आणि लोकपाल नेमणे आवश्यक आहे. तक्रारींचे निराकरण करण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचे ठरेल. 'शैक्षणिक' घटकाअंतर्गत शैक्षणिक दिनदर्शिका हा घटक महत्त्वाचा आहे. या माध्यमातून वर्षभर प्रस्तावित उपक्रम, परीक्षांच्या तारखा, सुट्ट्यांचा कालावधी, अभ्यासक्रमपूरक आणि इतर उपक्रम, इ.ची माहिती मिळते. विद्यापीठ एक आराखडा संलग्नित महाविद्यालयांना उपलब्ध करून देते. त्याआधारे महाविद्यालयांना आवश्यक ते बदल करून आपली शैक्षणिक दिनदर्शिका तयार करून ती संकेतस्थळावर उपलब्ध करावी लागते. प्रवेश आणि शुल्क हा कळीचा मुद्दा असतो. काही कारणांनी प्रवेश रद्द करावा लागला वा स्थलांतर करावे लागले तर महाविद्यालये भरलेल्या शुल्कात काही प्रमाणात कपात करून उर्वरित रक्कम परत करतात, मात्र यात एकवाक्यता नाही. काही महाविद्यालये जागा रिक्त राहिली, अशी सबब पुढे करून भरपाईची मागणी करतात. दरवर्षी मोठ्या प्रमाणात प्रवेश आणि शैक्षणिक शुल्कासंबंधी तक्रारी आयोगाला प्राप्त होत असतात. जून २०२४ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने परिपत्रक काढले. त्यानुसार या शैक्षणिक वर्षात ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत प्रवेश रद्द केल्यास पूर्ण शुल्क परत करावे, तसेच ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत प्रवेश रद्द केल्यास हजार रुपये प्रक्रिया शुल्क द्यावे लागेल, असे स्पष्ट करण्यात आले होते. स्वप्रकटीकरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक थांबू शकते.

संशोधन घटकाअंतर्गत विविध केंद्रीय सुविधा येतात. विज्ञान, भाषा, संगणक प्रयोगशाळा, कार्यशाळा, इ. सुविधांचा त्यात समावेश होतो. नवीन शैक्षणिक धोरणात 'कौशल्य विकास' केंद्रस्थानी असल्याने कार्यशाळेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या सुविधांबाबत संकेतस्थळांवर फारशी माहिती नाही.

'विद्यार्थी जीवन' या घटकाअंतर्गत वसतिगृह, तक्रार निवारण प्रणाली, आरोग्य सुविधा, अंतर्गत तक्रार समिती, रॅगिंग-विरोधी समिती, समान संधी केंद्र, वंचित घटक समिती, दिव्यांग सेवा सुविधा हे उपघटक महत्त्वाचे आहेत. अनेक महाविद्यालयांनी महिला वसतिगृहांचे रूपांतर पुरुष वसतिगृहांत केले आहे. काहींनी विद्यार्थिनी प्रवेश घेत नाहीत, अशी खोटी करणे देत वसतिगृहांत प्रशासकीय कार्यालये थाटली आहेत. विशेष म्हणजे विद्यापीठांसाठी यूजीसीने कोटी रुपयांचे अनुदान दिलेले आहे. अनुदानासाठी प्रस्ताव सादर करताना विद्यार्थिनींना वसतिगृह किती आवश्यक आहे, हे महाविद्यालयांनी आयोगाला प्रतिज्ञापत्राद्वारे पटवून दिले होते. आज १५-२० वर्षे उलटूनही विद्यार्थिनींसाठी वसतिगृहे का उपलब्ध झालेली नाहीत? सार्वजनिक स्व-प्रकटीकरणाच्या या नियमामुळे वसतिगृहांचे वास्तव समोर येणार आहे.

माजी विद्यार्थी हा घटक महत्त्वाचा आहे. बऱ्याचदा माजी विद्यार्थी समिती अनौपचारिक स्वरूपाची असते. त्याची धर्मादाय कार्यालयाकडे नोंदणी नसते. त्यामुळे आर्थिक व्यवहार पारदर्शक होत नाहीत. उपक्रमाच्या बाबतीत सातत्य नसते. नोंदणीकृत माजी विद्यार्थी समितीची आवश्यकता नॅकनेदेखील सातत्याने व्यक्त केली आहे. स्वप्रकटीकरण प्रक्रियेमुळे माजी विद्यार्थी संघटना रचना, पदाधिकारी, सदस्य, आर्थिक देणग्या, आयोजित केलेले उपक्रम, इ. माहिती सार्वजनिक होण्यास मदत होईल.

'माहिती विभाग' हा घटक या संपूर्ण स्व-प्रकटीकरण प्रक्रियेचा आत्मा असल्याने यात मुख्य माहिती अधिकारी, अपील अधिकारी, सूचना, परिपत्रके, बातम्या, महत्त्वाच्या घडामोडी, आरक्षण रोस्टर या प्रमुख बाबी आहेत. अनेक संस्थांनी आपली संकेतस्थळे अद्ययावत केलेली नाहीत. मुख्य माहिती अधिकारी, अपील अधिकारी, संपर्क, इ. माहिती शोधून सापडत नाही. ती कुठेतरी आतल्या पृष्ठावर दडवून ठेवलेली दिसते. काही नावाजलेल्या महाविद्यालयांनी तर तिथे अनावश्यक अर्जाचे नमुने, प्रक्रिया विशद केली आहे, मात्र माहिती अधिकाराचा वापर करून माहिती प्राप्त करण्यासाठी आवश्यक मुद्द्यांवर माहिती देण्यात टाळाटाळ केलेली दिसते.

उत्तम महाविद्यालयात प्रवेश मिळावा, अशी प्रत्येक विद्यार्थ्याची इच्छा असते. गूगल शोध त्यासाठी प्राथमिक मार्ग असतो. माहिती संकेतस्थळावर अधिकृतपणे उपलब्ध नसल्यास, नाइलाजाने तिसऱ्या पक्षाच्या संकेतस्थळावरून ती प्राप्त करावी लागते. त्यामुळे त्या माहितीच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होते. काही शैक्षणिक संस्था त्यांच्याकडे ज्या दर्जाच्या सेवा-सुविधा उपलब्ध नाहीत, त्या उपलब्ध आहेत अशीही प्रतिमा आपल्या संकेतस्थळावर निर्माण करतात. असे दावे फसवे असू शकतात. विद्यापीठ अनुदान आयोग, अशा महाविद्यालयांवर बारीक लक्ष ठेवणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणात दंडात्मक कारवाईची तरतूदही आहे. वार्षिक अहवालाच्या बाबतीत अनास्था आहे. वार्षिक अहवालात कोणत्या घटकांचा समावेश असावा, याविषयी स्पष्टता येणे गरजेचे आहे. अन्यथा अत्यंत त्रोटक आणि अपूर्ण माहितीच्या आधारेही अशा अहवालाचा केवळ सोपस्कार पूर्ण होईल.

महाविद्यालयांच्या संकेतस्थळांची आजची स्थिती पाहणे गरजेचे आहे. २०२१-२३ या कालावधीत राज्यातील पंचाहत्तर अ, अ , अ मानांकन प्राप्त केलेल्या कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयांच्या संकेतस्थळांचा अभ्यास केला असता, पुढील निष्कर्ष समोर आले. ७५ पैकी ७० महाविद्यालयांच्या संकेतस्थळांवर शोध-सुविधा उपलब्ध नाहीत. २७ महाविद्यालयांनी नॅकचे स्वयंमूल्यांकन अहवाल (एसएसआर) जाणीवपूर्वक काढून घेतले आहेत. ५२ महाविद्यालयांच्या संकेतस्थळांवर ताज्या घडामोडी सदराखाली जुनीच माहिती दिसते. ६३ महाविद्यालयांनी शैक्षणिक दिनदर्शिका दिलेली नाही आणि ही बाब तेथील शिक्षणाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे. ३४ संकेतस्थळांवर माहिती अधिकाराअंतर्गत कोणत्या अधिकाऱ्याशी संपर्क साधायचा, ही माहिती उपलब्ध नाही. ५७ महाविद्यालयांनी माहिती पुस्तिका प्रसिद्ध केलेली नाही. संकेतस्थळ हे संस्था आणि हितकारक घटक अथवा भागधारक यांच्यातील संवादाचे साधन असल्याने, निदान उच्च मानांकनप्राप्त महाविद्यालयांनी आपली संकेतस्थळे अद्ययावत करायला हवीत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आदेशानंतरही तसे होताना दिसत नाही, ही बाब चिंता वाढविणारी आहे.

पान १ वरून...

## अधिक सक्षम होण्यासाठी...

वास्तविक याचा परिपूर्ण वापर जर करता आला नाही, तर संबंधितांना आपल्या नोक-या गमाविण्याची भीती अधिक आहे. हे माध्यम वापरतांना मात्र प्रत्येकाला अगोदर स्वत:ला सिध्द करावे लागेल. एआयच्या माध्यमातून जी काही माहिती आपल्यासमोर येईल, त्या माहितीला अधिक पडताळून घेणे, त्यात असलेल्या त्रृट्या दुरूस्त करून अधिक परिपूर्ण करणे, अशा माहितीला नैतिक व संवैधानिक दृष्टीने पडताळून पाहणे व दक्ष राहून चुका दुरूस्त करणे, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे, असा इशाराही त्यांनी यावेळी बोलतांना दिला.

आज विविध समाजमाध्यमांचा लोकांवर प्रचंड प्रभाव आहे.

वसुंधरा अभियान ४.०हे यशस्वीपणे राबविल्याबद्दल ठाणे महापालिकेस तिसरा क्रमांक प्राप्त झाला आहे. या उपक्रमामध्ये महापालिका प्रशासनासोबत नागरिकांचा देखील महत्वाचा सहभाग असल्याबद्दल आयुक्त सौरभ राव यांनी ठाणेकर नागरिकांचे तसेच प्रदुषण नियंत्रण विभागाच्या मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांच्यासह सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

## बारवी धरणाचे पाणी शहराला...

नवी मुंबई महापालिकेला बारवी प्रकल्पातून २५ एमएलडी अतिरिक्त पाणी पुरवठ्याच्या मोबदल्यात ६८ प्रकल्प बाधितांना महापालिकेच्या अस्थापनेवर सामावून घेण्यात आले आहे. त्यानंतरही बारवीचे मंजूर पाणी पूर्ण क्षमतेने महापालिकेस मिळत नसल्याच्या तक्रारी असून हा प्रश्न यापूर्वी गणेश नाईक यांनी आक्रमकपणे लावून धरला होता.

बारवीच्या पाण्यासाठी जिल्ह्यात राजकीय चढाओढ?

बिनविरोध करण्याची परंपरा महाराष्ट्रात राहिली आहे. विधानसभेचा उपाध्यक्ष, परिषदेचा उपसभापती विरोधी पक्षांचा करण्याची परंपरा आहे ती खंडीत झालेली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे भूमिका मांडली आहे व ते याबाबत सकारात्मक आहेत. सभागृह चालवण्यासाठी विरोधी पक्षनेता नाही अशी व्यवस्था योग्य नाही. शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात विरोधी पक्ष नेता असला पाहिजे, त्यावर विधानसभा अध्यक्ष निर्णय घेतील अशी अपेक्षा आहे, असेही नाना पटोले म्हणाले.

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुधीर...

सुधीर रसाळ, ज्येष्ठ साहित्यिक साहित्य अकादमीच्या वतीनं वार्षिक साहित्य अकादमी पुरस्कार २०२४ ची घोषणा करण्यात आली. या पुरस्कारांमध्ये आठ काव्यसंग्रह, तीन कादंबऱ्या, दोन कथासंग्रह, तीन निबंध, तीन साहित्यिक समीक्षा, एक नाटक आणि

# आजपासून २४ डिसेंबरपर्यंत ठाणे महापालिका राबविणार ‘सुशासन सप्ताह’ (Good Governance Week 2024) विशेष मोहिम

**ठाणे (रोहित जैसवाल)** – सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण तातडीने व्हावे यासाठी केंद्रशासनाने Good Governance Week २०२४ हा सप्ताह महापालिका स्तरावर राबविण्याचे निर्देश दिले आहेत, त्यानुसार महापालिका कार्यक्षेत्रात दिनांक १९ ते २४ डिसेंबर २०२४ या कालावधीत सदर अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त सौरभ राव यांनी दिली.



केंद्रशासनाने ‘प्रशासन गाव की और’ अभियान राबविण्याचे निश्चित केले असून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार असून ठाणे महानगरपालिकेने देखील याची पूर्वतयारी केली असून उद्या १९ डिसेंबर ते २४ डिसेंबर २०२४ या कालावधीत कालावधीत दर दिवशी सकाळी ११ ते १ या वेळेत नरेंद्र बल्लाळ सभागृहात सर्व शिबीरांचे आयोजन केले जाणार आहे. तरी ठाणेकर नागरिकांनी सार्वजनिक कामांबाबत असलेल्या तक्रारी / समस्या अथवा सूचना महापालिकेकडे सादर करावयाच्या आहेत, या तक्रारींचे निराकरण महापालिकेच्या माध्यमातून प्राधान्याने करण्यात येणार आहे. ज्या नागरिकांना उपरोक्त नमूद दिवशी उपस्थित राहता येणार नाही त्यांनी आपल्या तक्रारी tmcgovernance@thanecity.gov.in या ई-मेलवर अथवा ८६५७८८७१०१ या भ्रमणध्वनीवर व्हॉटसॲपच्या माध्यमातून पाठवाव्यात असेही आयुक्तांनी नमूद केले.

या सप्ताहादरम्यान १९ डिसेंबर २०२४ रोजी सार्वजनिक आरोग्य विभाग, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय/राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय कळवा, जन्म मृत्यूविभाग, फायलेरिया विभाग, पशुवैद्यकीय विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग, परवाना विभाग, मालमत्ता करवसुली आदी विभागांच्या तक्रारीचे निराकरण करण्यात येणार आहे. तर २० डिसेंबर २०२४ रोजी शहर विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग, मलनिस्सारणविभाग, अग्निशमन विभाग, वृक्षप्राधिकरण व उद्यान विभाग, पर्यावरण विभाग, माहिती व तंत्रज्ञान या विभागांच्या तक्रारीचे निराकरण करण्यात येणार आहे.

२१ डिसेंबर २०२४ रोजी समाज विकास विभाग, दिव्यांग व्यक्ती कल्याणकारी योजना, महिला व बालविकास कल्याणकारी योजना आदी विभागांच्या तक्रारींचे निराकरण केले जाणार आहे. २२ डिसेंबर २०२४ रोजी आस्थापना विषयक बाबी तर २३२ डिसेंबर २०२४ रोजी Good Governance या विषयावर शासन सेवेत कार्यरत अथवा सेवेतून निवृत्त झालेल्या तज्ज्ञ अधिकारी यांचे ठाणे महानगरपालिकेमध्ये अधिकारी कर्मचारी यांचेकरिता विशेष व्याख्यान आयोजित केले जाणार आहे.

# वासिंदमध्ये बौद्ध समाजाच्या वतीने मुक रॅली काढून शहर बंद !



**वासिंद (विवेक गुंजाळ)** - परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ येथील बौद्ध समाजाच्या वतीने शहरात मुक रॅली काढून शहर बंद पाळण्यात आले.

परभणी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यावरील दगडफेक आणि संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना या निषेधार्थ आंदोलन करणाऱ्या सोमनाथ सुर्यवंशी या तरुणाचा पोलीस कोठडीत झालेल्या संशयास्पद मृत्यू या घटनेच्या निषेधार्थ मुक रॅली काढून शहरात बंद पाळण्यात आले.

यामध्ये राजेश निकम, जितेंद्र जाधव, प्रविण केदारे, बाळकृष्ण गायकवाड, प्रकाश वाघमारे, नंदकुमार सोष्टे, गुरुनाथ गायकवाड, रविंद्र जाधव, जीवन पंडित, संजीव जाधव, सुनील जाधव, सिद्धार्थ साळवे, के.एन. धनगर, ॲड.भावना निकम, ॲड. प्रतिभा कांबळे, भारती सोष्टे, जयश्री शेवाळे, प्रशांत गायकवाड, नरेंद्र कोचुरे, गणेश अहिरे आदी आंबेडकरी चळवळीतील सर्व राजकीय, सामाजिक, धार्मिक चळवळीतील पदाधिकारी व कार्यकर्ते बौद्ध समाजाच्या बॅनरखाली एकत्रित येऊन मुक रॅली व बंद यशस्वी पाळण्यात आला.

# ‘आपले सरकार पोर्टल’वरील २ हजार ३०१ तक्रारी निकाली

**ठाणे (यश सावंत)** - राज्य सरकारने सुरु केलेल्या आपले सरकार २.० वरील तक्रारी निकाली काढण्यासाठी जिल्हा परिषद, ठाणे सामान्य प्रशासन विभागाकडून विशेष मोहीम राबवण्यात आले आहे. जिल्हा परिषदेस दि. १९ सप्टेंबर, २०२३ रोजी पासून आपले सरकार पोर्टलवर २ हजार ३२६ तक्रारी प्राप्त झाल्या असून २ हजार ३०१ तक्रारी निकाली काढल्या आहे तर फक्त २५ तक्रारी पुढील कार्यवाहीसाठी क्षेत्रीय स्तरावर विस्तृत अहवाल मागणीसाठी प्रलंबित आहेत. या पोर्टलद्वारे ग्रामस्थांना आपल्या तक्रारी ऑनलाइन दाखल करणे तसेच त्याची सद्यस्थिती जाणून घेण्याची सुविधा उपलब्ध असून ९९ टक्के तक्रारी निकाली काढण्यात यश मिळवले आहे.

आपले सरकार २.०

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने जिल्हा परिषदेकडे येणाऱ्या तक्रारी २१ दिवसांच्या आत निकाली काढण्यासाठी सर्व विभागातील अधिकारी-कर्मचारी यांनी विषेश प्रयत्न केले आहेत.

आपले सरकार पोर्टलवरील प्राप्त तक्रारींचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक सोमवारी साप्ताहिक सखोल आढावा घेण्यात येतो. तक्रारदाराची तक्रार मांडणी व्यवस्थित न झाल्यास किंवा म्हणणे न समजल्यास तक्रारदारास दूरध्वनीवर तात्काळ संपर्क केला जातो. तक्रारींचे निवारण ठाणे जिल्हा परिषदेकडून उत्तमप्रकारे होत असल्याबाबत समाधान व्यक्त करण्यात येत आहे, अशी माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी, अविनाश फडतरे यांनी दिली.

केंद्र शासनाच्या प्रशासकीय सुधार विभागामार्फत सुशासन सप्ताह अंतर्गत “प्रशासन गाव की ओर” हे अभियान जिल्ह्यात दि.१९ ते २४ डिसेंबर, २०२४ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत आपले सरकार पोर्टलवरील तक्रारी निकाली काढण्यासाठी देखील यशस्वीरित्या प्रयत्न करण्यात येणार आहे.

# ठाणे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना तीन लाभांचा अश्व सित प्रगती योजनेचा लाभ द्यावा

**ठाणे (सम्यक कासारे)** - ठाणे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगानुसार तीन लाभांचा सुधारित सेवांतर्गत अश्व सित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबतचे आदेश एप्रिल २०२३ निर्गमित करण्यात आलेले आहे तसेच सन्माननीय खासदार श्री नरेश म्हस्के यांच्या समावेत आयुक्त सौरभराव व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये २६ ऑगस्ट २०२४ रोजी संयुक्त बैठकीत आयुक्त सौरभराव यांनी तीन लाभांचा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत निर्देश देण्यात आले होते.



वर्षे झाले तसेच सौरभ राव यांनी निर्देश चार महिने झाले तरी आस्थापना विभाग कडून अद्याप अंमलबजावणी होत नसल्याने भरत नांगरे सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या नेतृत्वाखाली बहुसंख्या कर्मचारी यांनी श्री उपायुक्त मुख्यालय यांची आज भेट घेतली. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोगाच्या नुसार यापूर्वी १२ व २४ चा आश्वासित प्रगतीचा लाभ देण्यात आलेला आहे त्याच धर्तीवर सातवा वेतन आयोगानुसार तरतुदीनुसार २४ मध्ये सहा वर्ष ॲड करून तिसरा लाभ देण्याबाबत ची विनंती केली व सेवानिवृत्त कर्मचारी ज्यावेळेस सेवानिवृत्त होतो त्याचे प्रशासनाकडून सर्व अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पेन्शन लागू झालेल्या कर्मचाऱ्यांना प्राधान्याने तिसरा लाभ देण्याबाबत आता फार विलंब न करता तिसऱ्या लाभाची आश्वासित प्रगती योजने ची अंमलबजावणी करण्याबाबत कर्मचाऱ्यांच्या वतीने मागणी करण्यात आली. यावर सकारात्मक चर्चा होऊन उपायुक्त मुख्यालय यांनी याबाबत माहिती घेऊन लवकरात लवकर फास्टट्रॅक वर सदर काम केले जाईल असे सर्व कर्मचाऱ्यांना आश्वासित केले. सदर

बैठकीला सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये श्री भरत नांगरे, अनिल गायकवाड, शशी कसबे, विलास काकडे शंकर भोसले, नागेश पाचकर तुकाराम कदम, नायकवडी, राठोड सुधीर चव्हाण, श्री व सौ घाग इत्यादी सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते .

## जवाहर नवोदय विद्यालय भातसानगर येथील जागेत व्हावे !

## ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात “अल्पसंख्याक हक्क दिवस” उत्साहात साजरा

## कार्यालयाअंतर्गत तक्रार निवारण समीतीची स्थापना करून माहिती ऑनलाईन द्यावी

## भारताला मोठा धक्का, ‘लापता लेडीज’ ऑस्करच्या शर्यतीतून बाहेर




किरण राव दिग्दर्शित ‘लापता लेडीज’ चित्रपटाला भारतात प्रेक्षकांचे व समीक्षकांचे खूप प्रेम मिळाले होते. भारताकडून ‘लापता लेडीज’ ऑस्करसाठी अधिकृत एंट्री म्हणून पाठवला होता. मात्र, हा चित्रपट ऑस्करच्या शर्यतीतून बाद झाला आहे. अकादमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट्स अँड सायन्सेसने बुधवारी सकाळी ही घोषणा केली. त्यामुळे भारताला ‘लापता लेडीज’साठी ऑस्कर मिळण्याची आशा संपली आहे.

‘लापता लेडीज’ ऑस्करमध्ये या कॅटेगरीत सिलेक्ट करण्यात आलेल्या १५ चित्रपटांच्या यादीत स्थान मिळवू शकला नाही. आता या टॉप १५ चित्रपटांपैकी पाच चित्रपटांना ऑस्करसाठी शॉर्टलिस्ट केले जाईल आणि त्यापैकी एका चित्रपटाला पुरस्कार मिळेल.

**ब्रिटनचा भारतीय चित्रपट झाला शॉर्टलिस्ट**

ब्रिटनची सह-निर्मिती असलेला व यावर्षी ऑस्करसाठी त्यांची अधिकृत एंट्री असलेला भारतीय पार्श्वभूमीवरील ‘संतोष’ चित्रपट शॉर्टलिस्ट झाला आहे. ब्रिटिश-भारतीय चित्रपट दिग्दर्शक संध्या सुरीचा ‘संतोष’ची चित्रपट ब्रिटिश अकादमीने ऑस्करच्या आंतरराष्ट्रीय फीचर फिल्म श्रेणीसाठी यूकेकडून पाठवला होता. हा चित्रपट हिंदी भाषेत चित्रीत केलेला आहे. यात शहाना गोस्वामी मुख्य भूमिकेत आहे. सुनीता राजवार, संजय बिश्नोई, कुशल दुबे आणि इतर कलाकारांनी या सिनेमात सहायक भूमिका केल्या आहेत.


**‘अनुजा’ झाली शॉर्टलिस्ट**

‘लापता लेडीज’ ऑस्करच्या शर्यतीतून बाहेर पडला असला तरी गुनीत मोंगा कपूर निर्मित लाइव्ह-ॲक्शन शॉर्ट फिल्म ‘अनुजा’ शॉर्टलिस्ट झाली आहे. ही शॉर्ट फिल्म वस्त्रोद्योगातील बालमजुरीच्या समस्येवर भाष्य करते. यामध्ये नागेश भोसलेसह अनेक कलाकार आहेत.

**२९ चित्रपटांमधून निवडला गेलेला ‘लापता लेडीज’**

९७ व्या अकादमी पुरस्कारांसाठी म्हणजेच ‘ऑस्कर २०२५’ साठी भारताकडून ‘लापता लेडीज’ची निवड करण्यात आली होती. सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय (विदेशी) चित्रपट श्रेणीसाठी ‘लापता लेडीज’ चित्रपट भारताने पाठवला होता. फिल्म फेडरेशनकडून लापता लेडीजसह एकूण २९ चित्रपट पाठवण्यात आले होते. यात रणबीर कपूरचा ‘ॲनिमल’, कार्तिक आर्यनचा ‘चंदू चॅम्पियन’, प्रभासचा ‘कल्की २८९८ एडी’, मल्याळम चित्रपट ‘आट्टम’, राजकुमार रावचा ‘श्रीकांत’ या २९ चित्रपटांमधून ‘लापता लेडीज’ची निवड समितीने केली होती. नितांशी गोयल, प्रतिभा रांता, स्पर्श श्रीवास्तव, छाया कदम, रवी किशन, आणि गीता अग्रवाल शर्मा यांच्या या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिका होत्या.

## १५ वर्षांनी नाना पाटेकर अन् शाहिद कपूर एकत्र, सोबत तृप्ती डिमरी!



२०२४ वर्ष संपत आलंय. या वर्षाची सुरुवात बॉलिवूडमध्ये हृतिक रोशनच्या ‘फायटर’ सिनेमाने केली होती. तर २०२४ ची अखेर साउथच्या ‘पुष्पा २’ ने गाजवली. २०२४ च्या पुढील काही दिवसांमध्ये

# ‘पुष्पा २’चं वादळ रोखण्यासाठी एसएस राजामौलींचा ‘मास्टरप्लान’; रिलीज करणार ‘हा’ बहुचर्चित चित्रपट





अल्लू अर्जुनचा ‘पुष्पा २’ या चित्रपटानं भारतीय फिल्म इंडस्ट्रीमध्ये वादल आणलं आहे. चित्रपटगृहांमध्ये या चित्रपटाला प्रेक्षकांचं भरभरून प्रेम मिळालं. या चित्रपटानं आतापर्यंत चांगली कमाई केली आहे. वरुण धवनचा बेबी जॉन हा चित्रपटही याच महिन्यात प्रदर्शित होणार आहे. ज्याचं दिग्दर्शन ॲटली कुमारनं केलं आहे. पण, आता या दोन दिग्गज दिग्दर्शकांच्या चित्रपटांना टक्कर देण्यासाठी एसएस राजामौली सज्ज झाले असून लवकरच ते आपला धमाकेदार चित्रपट रिलीज करत आहेत. आरआरआर चित्रपटाला मिळालेलं यश पाहता, आता एसएस राजामौली यांनी आरआरआर चित्रपटाचं मेकिंग रिलीज करण्याचा निर्णय घेतला आहे. एसएस राजामौली यांनी आजवर अनेक दर्जेदार चित्रपटांचं दिग्दर्शन केलं आहे. त्यांच्या सुपरडुपर हिट ठरलेल्या चित्रपटांपैकी एक म्हणजे, RRR. या चित्रपटानं फक्त बॉक्स ऑफिसवरच धमाल केली नाहीतर संपूर्ण देशातून खूप प्रेम आणि प्रशंसा मिळवली आहे.

एवढंच नाही तर स्टीव्हन स्पीलबर्ग, जेम्स कॅमेरून आणि रुसो ब्रदर्स यांसारख्या हॉलिवूड दिग्गजांनीही या चित्रपटाचं कौतुक केलं आहे. २०२२ मध्ये, जगानं RRR सारखा जबरदस्त चित्रपट पाहिला. जबरदस्त व्हिज्युअल्स, जबरदस्त ॲक्शन सीन्स, एक दमदार कथा आणि प्रतिभावान स्टार कास्ट असलेल्या या चित्रपटानं यशाचं एक नवं उदाहरण ठेवलं आणि बॉक्स ऑफिसवर अनेक विक्रम मोडीत काढले. एस. एस. राजामौली यांनी रिलीजच्या वेळी खळबळ माजवणारा राजामौलीचा आरआरआर आजही एका अनोख्या सिनेमाचं उदाहरण आहे. आता निर्मात्यांनी RRR बिहाइंड अँड बियॉन्डचा ट्रेलर आणला आहे.

RRR हा अशा काही चित्रपटांपैकी एक आहे ज्याने मनोरंजन उद्योगाची व्याख्या बदलली. मैत्री, देशभक्ती, राग, प्रेम अशा प्रत्येक भावनेला स्पर्श करणाऱ्या या चित्रपटानं प्रेक्षकांना थक्क केलं. आता निर्मात्यांनी RRR Behind and Beyond चा ट्रेलर लाँच केला आहे, जो आपल्याला या ब्लॉकबस्टरच्या आठवणींच्या प्रवासात घेऊन जातो. २० डिसेंबर रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे.

RRR मधली डान्स स्टेप विशेष गाजली. तसेच, सर्वच गाणी जगभरात हीट ठरली. मग ते नाटू नाटू, दोस्ती असो वा कोमुराम भीमुदो, या रामम राघवम हो ही गाणी सर्वांनाच आवडली. याशिवाय चित्रपटातील ॲक्शन सीन्समुळे चित्रपटाचं आकर्षण आणखी वाढलं आहे, जे प्रेक्षकांना खूप आवडलं. या चित्रपटानं एक मोठं आणि डोळ्यांचं पारणं फेडणारं जग सर्वांसमोर सादर केलं, ज्यामध्ये उत्कृष्ट VFX वापरले गेले आहेत. हा चित्रपट दिग्दर्शक एस. एस. राजामौलीचा बाहुबली २ नंतर पुढचा प्रोजेक्ट बाहुबली २ : द कन्क्लूजन आहे.

RRR हा खऱ्या अर्थानं एक खास चित्रपट होता, ज्यानं प्रेक्षकांची मनं जिंकली आणि खूप प्रशंसा मिळवली. या चित्रपटाचे परदेशी चित्रपट निर्माते आणि अभिनेत्यांनी विशेषत: हॉलिवूडनं खूप कौतुक केलं. चित्रपट निर्माते स्टीव्हन स्पीलबर्ग यांनी आरआरआरचं कौतुक करताना म्हटलं की, “मला माझ्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता - ही एक भेट होती... ते पाहणं आणि अनुभवणं विलक्षण होतं.” जेम्स कॅमेरून यांनी चित्रपटाच्या स्क्रीन प्ले, दिग्दर्शन आणि संगीताचं कौतुक केलं. त्याला RRR इतका आवडला की, त्यानं तो दोनदा पाहिला. रुसो ब्रदर्सनंही आरआरआर आणि त्याचं संचालक एस. एस. राजामौली यांचं कौतुक केलं. जो रुसो म्हणाले, “मी आरआरआर पाहिला आहे, आणि तो विलक्षण आहे.” ते पुढे म्हणाले की, “मला (RRR) बद्दल जे आश्चर्यकारक वाटतं ते म्हणजे, त्याची भावना, त्याच्या भव्यतेसह, ज्यामुळे प्रेक्षकांवर प्रभाव पडतो.



## अभिनेते मिलिंद गवळी या वयात फिट राहण्यासाठी काय करतात?

काही कलाकार हे जितके त्यांच्या अभिनयासाठी ओळखले जातात, तितकेच त्यांच्या फिटनेससाठीदेखील ओळखले जातात. लोकप्रिय मराठी अभिनेते मिलिंद गवळी हे त्यापैकीच एक आहेत. अनेक गाजलेल्या चित्रपटांतून मिलिंद गवळी यांनी प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले. अभिनयाबरोबरच त्यांच्या फिटनेसचीदेखील अनेकदा चर्चा होताना दिसते. आता एका मुलाखतीत मिलिंद गवळी यांनी तंदुरुस्त राहणे किती महत्त्वाचे याबाबत वक्तव्य केले आहे.

मिलिंद गवळी यांनी नुकतीच ‘लोकशाही मराठी फ्रेंडली’ या यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. यावेळी त्यांना त्यांच्या फिटनेसचे रहस्य विचारण्यात आले. त्यावर बोलताना मिलिंद गवळी यांनी त्यांची मुलगी मिथिला ही ट्रेनर, कोच असल्याचे म्हटले. याविषयी अधिक बोलताना त्यांनी म्हटले, “मिथिला ही ट्रेनर आहे. तिनं हे व्यवसाय क्षेत्र निवडलं आहे. तिनं तीन-चार डिग्री घेतल्या आहेत. इंटरनॅशनल पॉलिटिक्समध्ये एम.ए. केलं. आयएएस, आयपीएसची तयारीदेखील केली. हे करत असताना तिला थायरॉइडचा थोडा त्रास झाला. त्यानंतर तिनं फिजिकल ट्रेनिंग करायला सुरुवात केली. गोळ्या-औषधांनी बरी होण्याऐवजी तिनं स्वत:ला फिट करण्यासाठी फिजिकल ट्रेनिंग घेतले. हे करता करता तिच्या लक्षात आलं की, आता हे आयुष्यभर करायचं आहे. तर तिनं ते प्रोफेशन म्हणून निवडलं. ती कोच असल्यामुळे तिचं तर मी ऐकतोच. पण, तिला हे ट्रेन करणारा मीच आहे.



# लाडक्या बाबासाठी खास Surprise!

## रितेश देशमुखच्या वाढदिवशी दोन्ही मुलांनी केली ‘ही’ खास गोष्ट

बॉलीवूडसह मराठी कलाविश्व गाजवणारा तसेच

वर्षाव करण्यात आला आहे. याशिवाय त्याच्या कुटुंबीयांनी देखील रितेशसाठी खास Surprise प्लॅन केलं होतं.

रितेशने त्याचा वाढदिवस जवळचे काही मित्रमंडळी आणि कुटुंबीयांबरोबर साजरा केला. अभिनेत्याच्या दोन्ही मुलांनी लाडक्या बाबाच्या वाढदिवसानिमित्त



वाढदिवसानिमित्त जिनिलीया आणि दोन्ही मुलांसह एका रेस्टॉरंटमध्ये जेवायला गेला होता. यावेळी बाबाच्या वाढदिवसासाठी त्याच्या मुलांनी जेवणाचा मेन्यू ठरवला होता.

“डिअर बाबा, वाढदिवसाच्या

हेही वाचा : कॉटनची साडी नेसून लंडन फिरली प्रियदर्शिनी इंदलकर! मराठमोळ्या अभिनेत्रीचा देसी अंदाज पाहून चाहते म्हणाले, “फुलराणी…”


रितेश देशमुखच्या वाढदिवशी दोन्ही मुलांनी ठरवला जेवणाचा मेन्यू

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गृह विभागाच्या नवीन संकेतस्थळाचे अनावरण



**नागपूर (नितीन देवळेकर) :** महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे अनावरण करण्यात आले. www.home.maharashtra.gov.in या नावाचे अद्ययावत असे संकेतस्थळ आता माहितीजालकावर उपलब्ध झाले आहे.

मुख्यमंत्र्यांच्या रामगिरी शासकीय निवासस्थानी झालेल्या गृह विभागाच्या बैठकीत संकेतस्थळाचे अनावरण झाले. या बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य



सचिव डॉ. आय. एस. चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी तसेच अन्य विविध विभागांचे अतिरिक्त सचिव, प्रधान सचिव तसेच गृह विभाग, पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

हे नवीन संकेतस्थळ वापरकर्त्यांसाठी सुलभ करण्यात आले आहे. या संकेतस्थळावर विविध जलद दुवे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र कारागृह विभाग, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क (ऑनलाईन सेवा), आपले सरकार, महाराष्ट्र राज्य पोलीस, बृहन्मुंबई पोलीस,महाराष्ट्र सागरी मंडळ, महाराष्ट्र शासन, मोटार वाहन विभाग, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलिस अकादमी, केंद्रीय अन्वेषण ब्युरो, पोलीस संशोधन केंद्र, (सीपीआर) पुणे, गुन्हे अन्वेषण विभाग पुणे, महाराष्ट्र सुरक्षा दल, मुंबई वाहतूक पोलीस, एनजेडीजी | राष्ट्रीय न्यायिक डेटा ग्रिड, देशाच्या सेवेत भारतीय पोलीस, राष्ट्रीय तुरुंग माहिती पोर्टल, ई-प्रोसिक्युशन आदी विभागांचे जलद दुवे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

# बांगलादेशातील अस्थिरतेमुळे महाराष्ट्रातील गारमेंट उद्योगाला गती

**कोल्हापूर (प्रथमेश चव्हाण) :** बांगलादेशातील अस्थिर परिस्थितीमुळे तेथील गारमेंट व्यवसाय भारताकडे वळताना दिसत आहे. 'महाराष्ट्राचे मँचेस्टर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इचलकरंजीत गारमेंट उद्योजकांकडे तयार कपडे निर्मितीची मागणी दुपटीने वाढली असून राज्यभर हे चित्र सर्वत्र दिसत आहे. वर्षभरानंतर पुन्हा एकदा व्यवसायात भरभराट आल्याचे समाधान उद्योजकांमध्ये आहे.

बांगलादेश हा वस्त्रोद्योग निर्मितीत जगातील आघाडीचा देश मानला जातो. चीननंतर तयार कपड्यांचा सर्वात मोठा देश म्हणून या देशाकडे पाहिले जाते. बांगलादेशातील सध्याच्या बिघडलेल्या राजकीय परिस्थितीनंतर तेथील तयार कपडे निर्मितीची (गारमेंट) बाजारपेठ डळमळीत होऊ लागली आहे. तेथील गारमेंट उद्योग भारताकडे वळेल, अशी शक्यता ऑगस्ट महिन्यापासून वर्तवली जात होती. आता ती काही प्रमाणात प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे.



महाराष्ट्रात तयार कपडे बनवणाऱ्या व्यावसायिकांकडे गारमेंट निर्मितीची मागणी वाढत चालली आहे. यापूर्वी ज्या कंपन्या गारमेंट निर्मिती करत होत्या त्यांची मागणी कायम आहे. खेरीज, आता नव्या कंपनीचे प्रतिनिधी गारमेंट व्यावसायिकांचे उंबरटे झिजवताना दिसत आहेत. तयार कपडे बनवून द्यावेत यासाठी त्यांना गळ घातली जात आहे. परिणामी नेहमीची तयार कपड्यांची मागणी आणि नव्याने होऊ लागलेली मागणी पाहता गारमेंट व्यावसायिकांकडे त्यांच्या क्षमतेपेक्षा जवळपास दुप्पट तयार कपडे निर्मितीच्या मागणीचा रेटा वाढला आहे.

**SPORT**

# In stats: R Ashwin ends international career as one of the greatest spinners

**Gabha -** Ravichandran Ashwin, one of India's most iconic cricketers and a modern-day great, has retired from international cricket with immediate effect. The 38-year-old veteran spinner made the announcement following India's drawn third Test against Australia in Brisbane on Wednesday, December 18, marking the end of a stellar 14-year international career.

**LEGENDARY CAREER**

Ashwin retires as India's second-highest wicket-taker in Test cricket, with 537 dismissals in 106 matches. His tally of 37 five-wicket hauls is joint-second best in Test history alongside Shane Warne, only behind the legendary Muttiah Muralitharan (67). Known for his ability to outfox batters, Ashwin also holds the record for dismissing the most left-handers in Test cricket-an incredible 268 victims.

Across all formats, Ashwin has claimed 765 international wickets in 287 matches, ranking him second among Indian bowlers, behind Anil Kumble's 956 scalps. Globally, he stands 11th on the all-time list.

**DOMINANCE IN WTC**

Ashwin was a cornerstone of India's success in the World Test Championship. He became the first bowler to reach 100 wickets in the tournament and retires as its highest wicket-taker, with 195 scalps in 41 matches. His closest competitor is Australia's Nathan Lyon with 190.

Ashwin was not only a master with the ball but also a valuable contributor with the bat. His 3503 Test runs include six centuries and 14 fifties, making him one of only 11 all-rounders to achieve the



remarkable milestone of 3000 runs and 300 wickets in Test cricket.

In addition to his bowling achievements, Ashwin earned a record-equalling 11 Player-of-the-Series awards in Test cricket, tying with Muralitharan. Ashwin's career highlights also include significant contributions to India's ICC triumphs. He was part of the 2011 ODI World Cup-winning squad and played a key role in the 2013 Champions Trophy victory. While his performances in limited-overs cricket were commendable, it was in the Test arena that he truly shone.

**IPL STARDOM**

Ashwin's journey to international cricket began with his exceptional performances in the IPL, where he made his mark with the Chennai Super Kings (CSK) under MS Dhoni's captaincy. Known for his ability to deliver under pressure, especially during Powerplay overs, Ashwin became a vital cog in CSK's title-winning campaigns.

Following his international retirement, Ashwin will continue his cricketing journey in the IPL. He will rejoin CSK for the 2025 season, having been acquired by the franchise during the recent mega-auction.

**TALL LEGACY AT HOME**


Ashwin's dominance in Indian conditions was unmatched, with 383 of his Test wickets coming home at an average of 21.57. His ability to exploit spinning tracks made him virtually unplayable in Indian conditions. However, his overseas record, with 26 Tests played in SENA (South Africa, England, New Zealand, and Australia), often sparked debates, despite notable performances.

**MODERN GREAT**

Ashwin's retirement marks the end of an era for Indian cricket. His unparalleled records, strategic brilliance, and contributions to Indian cricket make him one of the greatest spinners in the game's history. As fans bid farewell to Ashwin on the international stage, they can look forward to witnessing his magic in the IPL, where his legacy will continue to inspire the next generation.

# Who is Joao Lucas Reis da Silva? First Openly Gay Tennis Player On The ATP Tour

**New Delhi -** The tennis world has been a tad bit shaken up by a 24-year-




locker room at some tournaments, I heard things that bothered me,

The Brazilian youngster recently featured in the Temuco

# Simona Halep And Cruz Hewitt Handed Wildcards For Australian Open Qualifying

**New Delhi -** Simona Halep was handed a wildcard for Australian Open





# बाळासाहेब ठाकरे स्मारकाचे ९९ टक्के काम पूर्ण

## महिनाभरात पहिल्या टप्प्याचे लोकार्पण करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन

● मुंबई, राकेश गायकवाड :

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाचे काम हाती घेतले असून स्मारकाची दोन टप्प्यामध्ये उभारणी करण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यातील ९९ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम येत्या १५ दिवसांत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यामुळे आता महिन्याभरात,जानेवारी २०२५ मध्ये स्मारकाच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण करून स्मारक सर्वसामान्यांसाठी खुले करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन आहे.




दादर येथील महापौर निवासस्थानी बाळासाहेब ठाकरे यांचे राष्ट्रीय स्मारक उभारण्यात येत आहे. प्रकल्पाचे काम दोन टप्प्यांत करण्यात येत असून पहिल्या टप्प्यात महापौर निवासाचे वारसा जतन आणि संवर्धन केले जात आहे. यात इमारतीचे बांधकाम, स्थापत्य, विद्युत, वातानुकूलित यंत्रणा उभारणी, बाह्य सजावट, वाहनतळ उभारणी यासह अन्य कामे केली जाणार आहेत. तर दुसऱ्या टप्प्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असे संग्रहालय बांधण्यात येणार आहे. त्यानुसार येथे 'इमर्सिव्ह म्युझियम एक्सपिरियन्स' संग्रहालय उभारण्यात येत आहे. दरम्यान, पहिल्या टप्प्याच्या कामाला २०२१ मध्ये सुरुवात करण्यात आली असून हा टप्पा आतापर्यंत पूर्ण होऊन सर्वसामान्यांसाठी खुला होणे अपेक्षित होते. मात्र, या टप्प्याच्या पूर्णत्वास काहीसा विलंब झाला आहे. मात्र, आता हा टप्पा महिन्याभरात सर्वसामान्यांसाठी खुला होण्याची शक्यता आहे. सुमारे २५० कोटी रुपये खर्चाच्या या पहिल्या टप्प्याचे ९९ टक्के काम पूर्ण झाले आहे. जानेवारी २०२५ मध्ये लोकार्पण करण्याचे नियोजन असल्याची माहिती एमएमआरडीएतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

### दुसऱ्या टप्प्यात 'लेझर शो'चा समावेश

■ दुसऱ्या टप्प्यासाठी मात्र नागरिकांना काही महिने प्रतीक्षा करावी लागणार आहे. दुसऱ्या टप्प्यात 'इमर्सिव्ह म्युझियम एक्सपिरियन्स' संग्रहालय उभारण्यात येत आहे. या म्युझियमच्या माध्यमातून येथे येणाऱ्यांना आपण बाळासाहेब ठाकरे यांच्याशी संवाद साधल्याचा, त्यांच्या प्रतिमेला स्पर्श करत असल्याचा अनुभव मिळणार आहे. अत्याधुनिक अशा डिजिटल भिंती, लेझर शो, दृकश्राव्य माध्यम, व्हर्च्युअल रियालिटी अशा तंत्रज्ञानाचा वापर करून हे संग्रहालय उभारण्यात येणार आहे. डिजिटल भिंतीवरील एखाद्या माहितीवर बोट क्लिक केल्याबरोबर दृकश्राव्य रूपात माहिती दिली जाणार आहे. त्यामुळे येथे येणाऱ्यांना एक वेगळीच अनुभूती मिळणार आहे. दुसऱ्या टप्प्याचे काम सुरू असून बाळासाहेब ठाकरे यांच्याशी संवाद साधल्याचा अनुभव घेण्यासाठी नागरिकांना काहीशी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# 'फडणवीसांच्या आग्रहानंतरही पक्षाकडून दुर्लक्ष'



● नाशिक , धनश्री सट्टा :

राष्ट्रवादीचे (अजित पवार) ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांची पाऊले आता तिसऱ्या बंडाच्या दिशेने पडत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आग्रह धरूनही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रिमंडळात आपला समावेश केला नाही. पक्ष नेतृत्वाकडून अवहेलना झाली, अशी नाराजी व्यक्त करणाऱ्या भुजबळ यांनी प्रफुल पटेल यांच्यावर संताप व्यक्त केला. फडणवीस यांच्याविषयी ममत्व दाखवितानाच अजित पवार गटाच्या शीर्ष नेत्यांवर टीकास्त्र सोडणाऱ्या भुजबळ यांचा प्रवास आता भाजपच्या दिशेने सुरू झाल्याची चर्चा होत आहे.

नाराज भुजबळ हे हिवाळी अधिवेशन सोडून नाशिकला परतले. मंगळवारी त्यांनी 'भुजबळ फार्म' या निवासस्थानी तसेच येवला मतदारसंघात समर्थकांशी चर्चा केली. पाच ते सहा महिन्यांमधील घटनाक्रम मांडला. राज्यसभा, लोकसभा निवडणुकीचे संदर्भ देत राष्ट्रवादीच्या शीर्ष नेत्यांवर रोष प्रगट केला. 'तुम्हाला आपण लहान मुलांचे खेळणे वाटतो का? तुम्ही उठ म्हटले की उठायचे आणि बस म्हटले की बसायचे? भुजबळ तसा मनुष्य नाही', अशा शब्दांत त्यांनी अजित पवार गटाच्या नेत्यांना फटकारले.

# तासंतास रांगेत ऊभे राहूनही धान्य मिळेना, लाभार्थ्यांमध्ये संतापाची लाट

## मशीन च्या तांत्रिक बिघाडामुळे लाभार्थी धान्यापासून वंचित



● पालघर, सुचिता सोनावणे:

पुरवठा विभागाच्या स्वस्त धान्य वितरण व्यवस्थेतील अनास्था पुन्हा एकदा समोर आली आहे.तालुक्यात गेल्या १५ दिवसांपासून वाटपाच्या मशीन मध्ये तांत्रिक अडचणी मुळे ते मशीन बंद पडत आहे.यामुळे येथील गोरगरीब जनतेची गैरसोय बघायला मिळत आहे.

डिसेंबर महिन्याचे जवळपास १७ दिवस लोटले असतानाही मशीन बंदच्या अभावी धान्य पुरवठा ठप्प आहे.नागरिकांच्या रोषाचा रेशन दुकानदार यांना सामना करावा लागतो आहे.

तासंतास रांगेत उभे राहुनही रेशन मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र लाट ऊसळताना दिसत असून शासन नागरिकांची गैरसोय थांबवेल का? असा संतप्त सवाल मात्र या निमित्ताने विचारला जात आहे.

एकीकडे शासनाने २०२९ पर्यंत मोफत रेशन वाटपाची घोषणा केल्यानंतर विधानसभा निवडणूक प्रक्रिया पूर्ण होऊन सरकार स्थापन होउनही जर गोरगरीब जनतेला आपल्या हक्काचे धान्य मिळत नसेल तर त्याला जबाबदार कोण? असाही प्रश्न निर्माण केला जात आहे.

■ ई-पॉस मशीनच्या तांत्रिक बिघाडामुळे तालुका स्तरावर रेशन वाटपाला व्यत्यय येत आहे.वरिष्ठांना माहिती दिली असता केंद्र स्तरावरून अडथळा येत आहे असे सांगण्यात येत आहे.

- नामदेव लहामगे, स्वस्त धान्य पुरवठा अध्यक्ष, मोखाडा तालुका

# अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत संकष्टी चतुर्थीला भाविकांची प्रचंड गर्दी

● पाली, भूषण सुतार :

मार्गशीर्ष महिन्यातील संकष्टी चतुर्थीला अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत श्री. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पहाटे पासूनच दर्शनासाठी लांब रांगा लागल्या होत्या. श्री. बल्लाळेश्वर मंदिर व गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली होती. श्री. बल्लाळेश्वराला देखील आभूषण व वस्त्र परिधान करण्यात आले होते. श्री. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रभरातून व भारतातून पालीत हजारो पर्यटक व भाविक दाखल झाले. यामुळे येथे चांगली आर्थिक उलाढाल होत असून



येथील स्थानिक व्यावसायिक सुखावले आहेत.

महाराष्ट्रभरातून पर्यटक व भाविक रायगड जिल्ह्यात पर्यटनासाठी दाखल होत आहेत. शिवाय पालीतून इतर पर्यटक देखील दक्षिण रायगड व कोकणाकडे व पुणे मुंबईकडे जात आहेत. परिणामी पर्यटक व भाविकांच्या गाड्यांमुळे पालीत वाहतुक कोंडी होत आहे. पाली पोलीस व देवस्थानचे सुरक्षा रक्षक वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न करत आहेत. मात्र कोंड सोडविणे अवघड होत आहे. भाविकांमुळे येथील हॉटेल व्यावसायिक, लोजिंग बोर्डींगवाले, पापड, लोणचे मिरगुंड विक्रेते, पेढेवाले, सरबतवाले, छोटेमोठे दुकानदार व इतर व्यावसायिकांचा धंदा तेजीत आहे. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले आहेत. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरुप आले आहे. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली आहे. विविध वस्तूंनी भरलेली दुकाने व गर्दी यामुळे मंदिर परिसर गजबजलेला दिसत आहे. अनेक भाविक स्वत:ची वाहने घेवून येत आहेत. तर काही लक्झरी किंवा खाजगी बसेसने येतात. यामुळे पालीतील रस्त्यावर वाहतूक कोंडी होत आहे.


बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी शुद्ध थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. नाममात्र दरात प्रसादालयामध्ये प्रसाद (भोजन) उपलब्ध आहे. सुरक्षारक्षक तैनात आहेत. भाविकांना राहण्यासाठी दोन सुसज्ज सर्व सोयी सुविधांनी युक्त आधुनिक भक्त निवास आहेत. रांगेत उभे राहण्यासाठी रेलींग व शेड उभारण्यात आली आहे. वाहने पार्क करण्यासाठी देवस्थानची दोन भव्य मोफत पार्किंग देखील आहे. तसेच सुसज्ज स्वच्छता गृह देखिल उभारण्यात आले आहेत. त्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही. देवस्थान ट्रस्ट तर्फे सर्वतोपरी योग्य व्यवस्था करण्यात आली आहे.

- जितेंद्र गद्रे, अध्यक्ष, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली

# साल्हेरजवळील सालोटा किल्ल्यावर चढाईसाठी नवीन वाट

● नाशिक, सचिन कदम :

महाराष्ट्रातील सर्वात उंच किल्ला साल्हेरचा जुळा भाऊ म्हटल्या जाणाऱ्या बागलाण तालुक्यातील सालोटा किल्लावर जाण्यासाठी आधिच असलेली दुसरी वाट



■ काळाच्या गर्तेत हरवलेली एक वाट शोधणे, सह्याद्रीतील अजोड अलौकिक अशा दुर्गसंपदेची गुणवैशिष्ट्ये मांडण्याचा प्रयत्न करणे, या एकमात्र उद्देशाने वैनतेयच्या पथकाने ही मोहीम हाती घेतली होती.

- प्रशांत परदेशी ( मोहीम प्रमुख, वैनतेय गिरीभ्रमण गिर्यारोहण

# महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना

## ऑनलाईन वीज बिल भरून बक्षिसे मिळवा

● मुंबई, विशाल पाटील :

महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या

नाही किंवा ऑनलाईन वीज देयक भरणा पर्याय वापरलेला नाही. ग्राहकांना लकी ड्रा व्दारे स्मार्ट फोन, स्मार्ट वॉच अशी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. ग्राहकांनी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरून लकी डिजिटल ग्राहक योजनेचा लाभ घ्यावा, असे महावितरणने आवाहन केले आहे.